# भारती विद्यापीठ मध्यवर्ती कार्यालय, पुणे

जा.क्र. : भा.वि./म.का./११२५३/२०१९-२०२० दिनांक : १२/०३/२०२०

## परिपत्रक

प्रति,
**शाखाप्रमुख,**
भारती विद्यापीठ व
भारती विद्यापीठ विश्वविद्यालय
______________________
______________________

**विषय :-कोरोना विषाणू संसर्गापासून संरक्षण करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना करणेबाबत.**

आपणांस ज्ञात आहेच की, चीन या देशात आढळलेल्या कोरोना या विषाणूचा संसर्ग आता जगातील ११२ देशांमध्ये झाला आहे. वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशनने (WHO)मृत्यूचे तांडव निर्माण करणारा विषाणू संसर्ग असे कोरोनाचे वर्णन केले आहे. पुण्यात कोरोना विषाणूचा संसर्ग झालेले रुग्ण सापडले आहेत. त्यामुळे आपल्या सर्वांची जबाबदारी आणखीनच वाढली आहे.

या पार्श्वभूमीवर भारती विद्यापीठाचे कार्यवाह, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाचे प्र-कुलगुरु राज्याचे सहकार, कृषी, सामाजिक न्याय, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ, मराठी भाषा, राज्यमंत्री **मा.ना.डॉ. विश्वजित कदम** यांनी भारती विद्यापीठ परिवाराच्या काळजीपोटी तसेच आपले व आपल्या कुटुंबियांचे हित लक्षात घेऊन या विषाणू संसर्गापासून संरक्षण करण्यासाठी खालील उपाययोजना करण्याचे आवाहन केले आहे. या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की,कोरोना विषाणू संसर्गाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपण त्याची योग्य ती कार्यवाही तातडीने करावी. या संदर्भात कसलाही हलगर्जीपणा करु नये.

**<u>तातडीने करावयाच्या उपाययोजना :</u>**

१. कोरोना विषाणू संसर्गासंदर्भात जनजागृती करण्यासाठी आवश्यक ती सर्व माहिती सेवकांना आणि विद्यार्थ्यांना द्यावी.
२. शाखेतील सर्व सेवकांना आणि विद्यार्थ्यांना मास्क वापरणे अनिवार्य करावे.
३. सर्व सेवकांना आणि विद्यार्थ्यांना त्यांच्याजवळ सॅनिटायझर ठेवण्याच्या सूचना द्याव्यात.
४. सेवकांपैकी कोणी सर्दी, ताप आणि खोकल्याने आजारी असल्यास त्याची रजा तात्काळ मंजूर करावी. विद्यार्थी आजारी असल्यास त्याला घरी विश्रांती घेण्याचा सल्ला द्यावा.
५. आपल्या महाविद्यालयाभोवतीच्या परिसरात स्वच्छता राखावी.
६. कोरोना विषाणू संसर्ग कमी होईपर्यंत स्नेहसंमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम, कार्यशाळा, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, सेमिनार्स, मेळावे घेऊ नयेत.

(प्रा. डॉ. के. डी. जाधव)
सहकार्यवाह(प्रशासन)
भारती विद्यापीठ, पुणे.

प्रत :-
१) मा. कुलपती, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय यांचे स्वीय सहाय्यक
२) मा. कार्यवाह, भारती विद्यापीठ, पुणे यांचे स्वीय सहाय्यक
३) मा. कुलगुरू, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय यांचे स्वीय सहाय्यक
४) मा. निवासी कार्यालय, भारती विद्यापीठ, पुणे
५) मा. कुलसचिव, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे
६) मा. सहकार्यवाह (अकौंटस्), भारती विद्यापीठ, पुणे
७) मा. सहकार्यवाह(इस्टेट), भारती विद्यापीठ, पुणे.